# कार्यालयीन टिप्पणी

विषय:- मा. हरित लवादाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Fource**) ची स्थापना करणे बाबत.

**संदर्भ**:- राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांबाबत कृति आराखडा राबविण्याबाबत नदी पुनरुत्थान समितीची स्थापना करण्याबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८.

देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांबाबत दिनांक. १७/०१/२०१८ रोजी दैनिक "द हिंदू" मध्ये प्रसिध्द वृत्ताच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक. २९/०९/२०१८ रोजी आदेश पारित करताना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्ट्यांचे वर्गीकरण प्राथम्य क्र. **I** ते **V** प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्ट्यांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्ट्यांमधील ९ प्रदूषित पट्टे प्रथम्य क्र. **I**, ६ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. **II**, १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्रमांक **III**, १० प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. **IV** व १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. **V** मध्ये समाविष्ट आहेत. मा. हरित लवाद, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशांनुसार राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्ट्यांमधील प्रदूषण कमी करण्याकरिता कृति आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरिता नदी पुनरुत्थान समिती, पर्यावरण सनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन खालील प्रमाणे आदेशित केले आहे.

मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Force**) ची स्थापना प्रदूषण पट्टे असलेल्या जिल्हयाची करावयाची असल्याचे आदेश देण्यात आले आहे. विशेष कृती दलाची समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात यावी.

| **अ.क्र.** | **कृती दलाचे सदस्य** |
|---|---|
| १ | जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी |
| २ | जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनिधी |
| ३ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी (उप-प्रादेशिक अधिकारी) |
| ४ | विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधीश यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी |

सबब शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे जिल्हास्तरिय विशेष कृती दल गठीत करण्याकिरता प्राथमिक बैठक घेण्या करिता तारीख व वेळ देण्यात यावा हि नम्र विनंती.

उप-प्रादेशिक अधिकारी, अकोला

जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी — अपर जिल्हाधिकारी अकोला — प्रतिनिधी

जिल्हाधिकारी, अकोला

..२..